REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 4 | JANUARY - 2023

# साधना साप्ताहिकातील दलित चळवळ

**डॉ. अनुराधा वसंत गुजर**
**मराठी विभाग, सुभाष बाबुराव कुल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, केडगाव,ता.दौंड,जि.पुणे.**

## प्रस्तावना



साधना साप्ताहिकात १९४८ ते १९७७ या कालखंडात दलितांविषयी महत्वपूर्ण लिखाण केले गेले.अनेक विचारवंत मान्यवरांनी दलित चळवळीविषयी,त्यांच्या व्यथांना वाचा फोडणारे लेख साधना साप्ताहिकातून प्रकाशित झाले.उदा: 'हरिजनांचा प्रश्न' [११ डिसेंबर १९४८], सत्यशोधक चळवळीचे तारू कुठे भरकटतेय ?बाबा आढाव [११ मार्च १९७२]इ.इ.दलित चळवळ सामाजिक चळवळ नराहता त्याला राजकीय स्वरूप प्राप्त झालेले दिसून येते. 'साधना' साप्ताहिकाने काही निवडक लेखांच्या माध्यमातून दलित समाजाची दखल घेतलेली दिसून येते.

दलित समाजाला या स्वातंत्र्याने काय दिले? असा बंडखोर प्रश्न सर्वात प्रथम साधना साप्ताहिकात ११ डिसेंबर १९४८ मध्ये लिहिलेला 'हरिजनांचा प्रश्न' या अग्रलेखातून केला गेला साधना मधून वेळोवेळी दलितांच्या प्रश्नावर क्रांतिकारी विचार विचार मांडले या महाराष्ट्रात दलित आणि मागासवर्गीय यांचे जीवन कमालीचे असुरक्षित होते त्याचाच अनुभव घेत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातले दलित स्त्री पुरुष अतिशय लाचार जीवन जगत होते अन्याय सहन करत होते त्यांच्या अन्यायाला कोणी वाचा फोडत नव्हते आणि आर्थिक विष्णतेमुळे हा वर्ग तोंड दाबून बुक्क्याचा मार सहन करावातसा असहाय्यपणे जगत होता दलितांवर होणाऱ्याअन्यायाच्या बाबतीतील महाराष्ट्राची संवेदना बोथट होत असताना साधनातून लिहिल्यां गेलेल्या लेखातून दलितांच्या अवस्थेचे चिंतन केले गेले तसेच महाराष्ट्रातल्या राजकारणामध्ये दलितांच्या समाजकारणाचे आणि राजकारणाचे नवे पर्व सुरु झालेले दिसून येते.पिचलेल्या दबलेल्या लोकांचा आवाज साधनाच्या लेखातून बुलंद झाला दलित समाज त्यामुळे जागरूक होऊ लागला.कोणी जर दलितांवर अन्याय केला तर त्याचा प्रतिकार संघटितपणे होऊ शकतो असे वातावरण स्वातंत्र्योत्तर काळात निर्माण झालेले दिसून येते. ११ डिसेंबर १९४८ मध्ये साधना साप्ताहिकातून 'हरिजनांचा प्रश्न ' हा संपादकीय लेख प्रसिद्ध झाला.या लेखात सरकारने नुसते कायदे करू नये तर काय भूमिका असावी या बाबत प्रबोधनात्मक लिहिले गेले उदा: "जो पर्यंत मानव मानवाला मानवतेने वागवायला तयार नाही तोपर्यंत स्वातंत्र्याचा अर्थ आम्हाला कळला नाही परकीयांची सत्ता झुगारायला आपण अधीर असतो परंतु आपण आपल्या बांधवावर गुलामगिरी लादत असतो तिचे समर्थन करीत असतो.हे आश्चर्य नव्हे का? हैद्राबाद मधील हिंदी जनता निजामी जुलुमाला कंटाळली रझाकारी जाचांनी त्रस्तझाली.परंतु हैद्राबाद मधील तमाम हरिजनांना सारे नागरिकत्वाचे हक्क मिळाले का?ज्या एकनाथांनी हरिजनाचे पोर कडेवर घेतले त्या नाथांच्या समाधीचे दर्शन हरिजनांना घेता येते का?"

हरिजनांचे प्रश्न सोडविण्यासाठी सरकारने पुढे आले पाहिजे अशी भूमिका या लेखातून मांडली गेली आहे.

साधना साप्ताहिकातून केलेले लिखाण केवळ अस्पृश्यता निर्मुलनाच्या दृष्टीनेच केले आहे असे नाही तर देश एकात्म करण्याच्या दृष्टीने जे सर्वंकष परिवर्तन अभिप्रेत आहे.त्या दृष्टनेहीहे लेख उपयुक्त आहेत. अस्पृश्यता हा एक रोग आहे असे समजून गेली कित्येक वर्ष तिच्या निर्मुलनाचे प्रयत्न होत आहेत पण अस्पृश्यता हे समाजाच्या हाडामाशी खिळून बसलेल्या दीर्घकालीन मानसिक आजाराचे एक लक्षण आहे.हि गोष्ट समजून घेण्याची व व त्या दृष्टीने समाजाचे प्रबोधन करण्याची आवश्यकता आहेहे साधनातून लिहिलेल्या लेखनातून सिद्ध होते.साधनातून प्रसिद्ध झालेला लेख त्या दृष्टीने जाणीवेत बदल घडवून आणण्याचे कार्य करण्याच्या योग्यतेचा आहे.गांधीजींनाअत्यंत प्रिय असलेले एकात्म राष्ट्राच्या निर्मितीचे कार्य जातीनिर्मुलनाशिवाय शक्य नाही हा विचार साधनातून जनसामान्यांपर्यंत पोहचवण्याचे कार्य केले.उदा: यालेखातील हे विधान पहा "भारत खेड्यात वसलेला आहे;हि जाणीव गांधीजींनी निर्माण करून दिली तेव्हा या खऱ्या भारतात एकात्मतेची अवस्था कोणती आहे हे पाहणे युक्त होईल .त्याच वेळी जातीनिर्मुलाना शिवाय भारतीय ऐक्य बेगडी ठरेल या जाणीवेने प्रवृत्त झालेल्या जातिनिर्मूलन संस्थेतही समांतर विचार सुरु होता "

कोणत्याही समाजात प्रबोधन करत असताना रचनात्मक पद्धतीचे जर हे कार्य झालेमानवी मनावर ते चांगले बिंबवले जाते. नुसते एखाद्या व्यक्तीचे कार्य सांगून चालत नाही तर त्याच्या कार्यामुळे समाजावर त्याचा दूरगामी परिणाम कसा होईल त्याचे दुष्परिणाम तर होणार नाहो याची काळजी साधनातून लिहिलेल्या लेखात घेतली गेली.

'अस्पृश्यांनी समाज परिवर्तनात सहभागी व्हावे' या नावाचा प्रा.ल.बा.रायमाने यांनी २१ नोव्हेंबर १९७० मध्ये हा लेख लिहिला.समाज परिवर्तनाच्या कार्यात अस्पृश्य समाज जो पर्यंत सहभागी होत नाही तो पर्यंत या समाजाला भवितव्य नाही. या लेखात ते म्हणतात- ' समाज परिवर्तनाचा विचार पेलण्याइत्कि समर्थता त्याच्यात नसेल किंवा ठेविले अनंते तैसेची रहावे याच्यापुढे त्यांचा विचार जात नसेल यामुळे गुंतागुंतीक धर्मश्रद्धा, अंधपणा, देवभोळेपणा यांचाच जबरदस्त पगडा त्यांच्यावर पडलेला दिसतो हा अज्ञानाचा पगडा ते जो पर्यंत दूर सारत नाहीत तो पर्यंत त्यांना पुढचा नेमका व दूरगामी मार्ग दिसणार नाही सामाजिक जाणीव त्यांच्यात निर्माण होणार नाही. देशाच्या राजकीय ,सामाजिक,सांस्कृतिक आदिकार्यात आपला वाटा उचलण्यात ते समर्थ होणार नाही समाज परिवर्तनाच्या कार्यात हा समाज जो पर्यंत सहभागी होत नाही तो पर्यंत या समाजात भवितव्य नाही.'

दलितांनी खऱ्या अर्थाने स्वत:ची मानसिकता बदलणे गरजेचे आहे असा विचार साधनाच्या या लेखातून मांडला गेलेला दिसतो.दलितांचे प्रबोधन करणे गरजेचे आहे हेचया वरून आपल्या लक्षात येते.

१६ सप्टेंबर १९७२ मध्ये दि.के.बेडेकर यांचा दलितांची ससेहोलपट हा लेख प्रसिद्ध झाला.या लेखात लोकशाही विषयी विचार मांडले आहेत .उदा: लोकशाही म्हणजे बहुसंख्याकांचे बहुमताने चाललेला राज्यकारभार आणि सामाजिक व्यवहार हे खरे आहे.पण अर्धे खरे आहे लोकशाहीची कसोटी आणखी एक आहे बहुमताने चालणाऱ्याशासनात सामाजिक व्यवहारात आणि सर्व क्षेत्रातील जीवन रहाटीत अल्पसंख्य समूहांना जर मानाने जगता येत नसेल तर लोकशाहीचा दावा खोटा .भारतामध्ये दलित समाज हा अपल्संख्य आहे.खेड्यापाड्यातून दलित जातीची माणसे मुठभर असतात.आणि बहुतेक दरिद्री असतात.रामदास ननावरेचा छळ करून देवीला बळी दिला, कोठे बौद्ध स्त्रीला विवस्त्र केले या गोष्टी कोणी केल्या ? त्यांना असे वर्तन करण्याचा धीर कसा झाला ? परंपरेत लाख गोष्टी घडत आल्या असतील पण १९७२ साली या घडू शकल्या याचा अर्थ आजचा भारतीय समाज लोकशाहीची शिकवण पचवू व रुळवू शकला नाही.'

दलितांवरील अन्याय हा लोकशाहीच्या पद्धतीचा अवमान आहे असे परखड विचार साधना च्या लेखातून मांडले गेले.साधनातून अतिशय स्पष्टपणे या विषयावर संताप व्यक्तकेला आहे.

अशा प्रकारे साधना साप्ताहिकाने दलित चळवळ या विषयावर विविध मान्यवरांचे लेख प्रकाशित करून समाजातील प्रत्येक घटकाला सरकारला दलित वर्ग यांना संघटीत होण्यास जागृत केले.तसेच अन्यायाला वाचा फोडण्यासाठी लेखाच्या माध्यमातून समाजात जागृती घडवून आणलेली दिसते.

**संदर्भ:**

1. संपादकीय अग्रलेख, 'हरिजनांचा प्रश्न ',साधना साप्ताहिक ११ डिसेंबर १९४८.
2. एस.एम.जोशी, ' जातीयवाद येथे का?',साधना साप्ताहिक २८ जुलै १९५६.
3. संपादकीय अग्रलेख ,'महाराष्ट्रातील दलित:शोध आणि बोध'साधना साप्ताहिक ३ मार्च १९७३ .
4. ल.बा.रायमाने [प्रा] 'अस्पृश्यांनीसमाज परिवर्तनात सहभागी व्हावे',साधना साप्ताहिक ,२१ नोव्हेंबर १९७०.
5. दि.के.बेडेकर, 'दलितांची ससेहोलपट' साधना साप्ताहिक,१६ सप्टेंबर १९७२.
6. डॉ.शोभा वाईकर ,साधना साप्ताहिकातील सामाजिक, आर्थिक, राजकीय योगदान [इ.स.१९४८ ते १९७७] ऑगस्ट २०१८ पीएचडी प्रबंध अ प्रकाशित .